# मेट्रो-३ मार्गावरील भुयारी मेट्रोच्या चाचण्या येत्या फेब्रुवारीपासून सुरू

■ मुंबई

दक्षिण मुंबईच्या टोकापासून उत्तर मुंबईच्या टोकापर्यंत धावणाऱ्या मेट्रो-३ या नावाने ओळखला जाणारा कुलाबा-वांद्रे- सिप्झ मेट्रो मार्ग जुलै २०२४ पर्यंत पूर्णपणे खुला केला जाणार आहे.कारण आता येत्या फेब्रुवारी महिन्यापासून या मार्गातील भुयारी मेट्रोच्या वेग चाचण्या सुरू होणार आहेत.तीन किलोमीटर असलेल्या भुयारी मार्गावर सहार रोड पर्यंत या चाचण्या चालणार आहेत,अशी माहिती एमएमआरसीचे प्रकल्प संचालक सुबोध गुप्ता यांनी दिली.

आतापर्यंत या मार्गावरील प्रोटोटाईप मेट्रो ट्रेनच्या १ हजार चाचण्या झाल्या आहेत.यावर्षी ऑगस्टमध्ये प्रोटोटाईप आली तेव्हा तिचा वेग १० किमी प्रतितास इतका होता. आता हाच वेग ६० ते ६५ किमी प्रतितास इतका केला आहे. यापुढे जास्तीत जास्त ८५ पर्यंत नेला जाईल. मुळात या गाडीची सर्व रचना ९५ किमी वेगासाठी करण्यात आली आहे. प्रोटोटाईप चाचण्यानंतर आरडीएसओच्या निकषानुसार या मेट्रोच्या वेग चाचण्या घेतल्या जातील. डिसेंबर २०२३ पर्यंत आरे वांद्रे ते कुर्ला संकुल तर जुलै २०२४ पर्यंत संपूर्ण मार्गच खुला केला जाईल. सध्या मुंबईत ८ डब्यांची मेट्रो ट्रेन आहे. दुसरी ट्रेन डिसेंबरमध्ये दाखल होईल.



वास्तविकता अल्ट्राम कंपनी एकूण ३१ मेट्रो ट्रेन बनविणार असून या सर्व आठ डब्यांच्या असतील. सध्या सारीपुत नगर आरे व मरोळ स्टेशन या भागात मेट्रोच्या चाचण्या सुरू आहेत.